# माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड

अध्यक्ष आणि प्रबंध संचालक यांचे निवेदन

सर्व अधिकारी गण

विषय : एमडीएल ची व्हिसल ब्लोअर पॉलिसी

कंपनीच्या नैतिकता धोरणाविषयीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन यासंबंधीची माहिती व्यवस्थापनाला देण्याच्या हेतूने कर्मचाऱ्यांकरता एक यंत्रणा स्थापित करावी या दृष्टिकोनातून दिनांक 20 नोव्हेंबर 2014 रोजी संचालक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत एमडीएलसाठी एक व्हिसल ब्लोअर पॉलिसी बनवण्यासंबंधीचा ठराव करण्यात आला. या पॉलिसीची एक प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

ही एमडीएलची व्हिसल ब्लोअर पॉलिसी तात्काळ लागू करण्यात येईल.

अध्यक्ष आणि प्रबंध निदेशक

मुंबई 400010

28 जानेवारी 2015

संलग्न : उपरोल्लेखित

प्रत :

संचालक मंडळ

मुख्य सतर्कता अधिकारी

# माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडची  व्हिसल ब्लोअर पॉलिसी

## 1. प्रस्तावना

1.1 ही पॉलिसी यासाठी बनवण्यात आली आहे की

अ. कर्मचाऱ्यांना संबंधित विषय सक्षम प्राधिकारी / लेखा परीक्षक समितीसमोर विश्वासपूर्ण रितीने  आणि नैतिक व कायदेशीर प्रकारे सर्वोच्च मानक स्थापित करून आणि कंपनीत कोणताही अनैतिक आणि अनुचित व्यवहार किंवा गैरवर्तन आढळून आल्यास ते व्यवस्थापनाच्या नजरेस आणून देण्याची संधी मिलावी.

आ. कर्मचाऱ्यांना बदला किंवा त्रास होण्यापासून संरक्षण मिळावे याकरता आवश्यक ते सुरक्षात्मक उपाय योजले जावेत. तसेच व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यापासून प्रतिबंधित करण्यात यावे.

1.2 अवजड उद्योग आणि सार्वजनिक उपक्रम मंत्रालया अंतर्गत सार्वजनिक उपक्रम विभागाद्वारे जारी करण्यात आलेल्या अधिसूचना क्र . 18(8)/2005 – जीएम दिनांक 22 जून 2007 द्वारे केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांकरता मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार कंपनी आपल्या कर्मचार्यांकरता व्हिसल ब्लोअर पॉलिसी ची स्थापना करेल. ज्याद्वारे कर्मचारी अनैतिक आचरण , प्रत्यक्ष किंवा संशयास्पद गैरकृत्य, नैतिकता धोरण याविषयीची माहिती व्यवस्थापनाला देऊ शकेल.

1.3 उद्देश

अ. कर्मचाऱ्यांना बदला किंवा त्रास होण्यापासून संरक्षण देऊ करणे. कर्मचाऱ्यांना व्हिसल ब्लोअरची भूमिका विश्वासाने निभावण्यासाठी तसेच कंपनीत कोणताही नैतिक किंवा अनुचित व्यवहार किंवा कोणतेही गैरवर्तन आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या नजरेस आणून देण्याची संधी देणे.

आ. व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना या कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यापासून प्रतिबंधित करणे.

1.4 व्हिसल ब्लोअरची खराब कामगिरी किंवा गैरवर्तन यांच्याशी संबंधित केलेली कारवाई ज्याचा  व्हिसल ब्लोअरने  केलेल्या कोणत्याही प्रगटीकरणशी संबंध नाही, त्याला या पॉलिसीद्वारे कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जाणार नाही.

1.5 याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की या पॉलिसीचा  एमडीएलच्या सतर्कता प्रणालीवर कोणताही परिणाम होणार नाही. उलट प्रस्थापित सतर्कता प्रणालीच्या व्यतिरिक्त या पॉलिसी अंतर्गत कर्मचाऱ्यांनी केलेल्या संरक्षित प्रगटीकरणात एखादा सतर्कता विषयक मुद्दा आढळल्यास प्रस्थापित पद्धतीनुसार तो मुख्य सतर्कता अधिकारी यांच्याकडे पाठवला जाईल.

## 2. <u>व्याख्या</u>

2.1 एमडीएल म्हणजे माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड

2.2 लेखा परीक्षा समिती चा अर्थ आहे एमडीएल च्या संचालक मंडळाने स्थापित केलेली लेखा परीक्षा समिती

2.3 सक्षम प्राधिकारी म्हणजे एमडीएल चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आणि त्यासोबत या पॉलिसीच्या अंतर्गत त्यांनी वेळोवेळी आपले अधिकार ज्याला दिले आहेत असा सक्षम प्राधिकारी प्रतिनिधी. या बाबतीत कोणताही वाद उद्भवल्यास संबंधित व्यक्ती अव्यसं असल्याने सक्षम प्राधिकारी म्हणजे लेखा परीक्षा समितीचे अध्यक्ष होत .

2.4 कर्मचारी म्हणजे भारत अथवा परदेशात कार्यरत असलेले कंपनीचे सर्व कर्मचारी, यामध्ये संचालकांचा ही समावेश आहे .

2.5 अनुचित आचरण याचा अर्थ आहे कोणत्याही कर्मचाऱ्याने केलेले अनैतिक आचरण, प्रत्यक्ष / संशयास्पद गैरकृत्य किंवा नैतिकता धोरणाचे उल्लंघन.

2.6 तपासनीस - संरक्षित प्रकटीकरणमध्ये केलेल्या तपासासंदर्भात अध्यक्ष आणि प्रबंध संचालक / सक्षम अधिकारी यांनी प्राधिकृत, नियुक्त केलेली, संपर्क केलेली किंवा जिचा सल्ला घेतला आहे अशी व्यक्ती;  यामध्ये एमडीएलच्या लेखापरीक्षकांचाही समावेश आहे.

2.7 संरक्षित प्रगटीकरण म्हणजे अनैतिक किंवा अनुचित आचरण याकरता पुरावा म्हणून ओळखला जाईल अशी विश्वासपूर्ण रीतीने उघड केलेली कोणतीही सूचना किंवा संभाषण.

2.8 छाननी समिती म्हणजे एमडी एल च्या व्हिसल ब्लोअर पॉलिसी अंतर्गत गठीत केलेली समिती ज्यामध्ये अध्यक्ष आणि प्रबंध संचालक किंवा त्यांच्या अनुपस्थितीत त्यांनी नामनिर्देशित केलेले कार्यात्मक संचालक; आणि अध्यक्ष, लेखापरीक्षा समिती किंवा त्यांच्या अनुपस्थितीत त्यांनी नामनिर्देशित केलेला लेखापरीक्षा समितीचा सदस्य .

2.9 सेवा नियम म्हणजे एम डी एल मधील आचरण, अनुशासन आणि अपील 1977 प्रमाणित स्थायी आदेश

2.10 व्यक्ती म्हणजे ज्याच्याविरुद्ध अथवा ज्याच्याविषयी संरक्षित प्रकटीकरण केले गेले आहे किंवा तपासादरम्यान पुरावे गोळा केले गेले आहेत असा कर्मचारी /अधिकारी.

2.11 व्हिसल ब्लोअर चा अर्थ या पॉलिसी नुसार संरक्षित प्रगटीकरण करणारा कर्मचारी.

## 3. पात्रता

एम डी एल चे सर्व कर्मचारी संरक्षित प्रगटीकरण याकरता पात्र असतील.

## 4. मार्गदर्शक तत्त्वे

4.1 संरक्षित प्रकटीकरणवर कालबद्ध पद्धतीने कारवाई केली जाईल.

4.2 व्हिसल ब्लोअर ची वैयक्तिक माहिती पूर्णतः गुप्त ठेवण्यात येईल .

4.3 व्हिसल ब्लोअर किंवा सुरक्षित प्रगटीकरण करणाऱ्या व्यक्तीला कोणताही त्रास दिला जाणार नाही.

4.4 संरक्षित प्रकटीकरण चा पुरावा गोपनीय ठेवला जाणार नाही. आणि पुरावा लपवण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास शिस्तभंगाच्या कारवाईसह योग्य ती कारवाई करण्यात येईल .

4.5 संरक्षित प्रकटीकरण करण्याच्या संदर्भातील व्यक्ती अर्थात ज्याच्याविरुद्ध किंवा ज्याच्याविषयी संरक्षित प्रकटीकरण करण्यात आले आहे असा / अशी कर्मचारी तिला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

4.6 व्हिसल ब्लोअरने कोणत्याही अनुचित आचरण ची किंवा पद्धती ची माहिती तात्काळ सक्षम प्राधिकारी यांच्या नजरेस आणून देणे आवश्यक आहे. यासाठी त्याला पुरावा देण्याची जरी आवश्यकता नसली तरी त्याच्यापाशी दखलपात्र कारण असणे आवश्यक आहे.

4.7 व्हिसल ब्लोअरने पूर्ण गोपनीयतेने तपास अधिकाऱ्याला सहकार्य करणे आवश्यक आहे.

## 5. व्हिसल ब्लोअर - भूमिका आणि संरक्षण

### भूमिका

5.1 व्हिसल ब्लोअरची भूमिका खात्रीलायक माहिती देणाऱ्या पक्षकारांची असेल.

5.2 व्हिसल ब्लोअरने स्वतःहून कोणताही तपास करणे अपेक्षित नाही किंवा तशी गरजही नाही.

5.3 आवश्यकता भासल्यास व्हिसल ब्लोअरला तपास प्रक्रियेशी जोडून घेतले जाईल. परंतु त्याला त्यात भाग घेण्याचा अधिकार नसेल.

5.4 सक्षम अधिकारी द्वारा संरक्षित प्रकटीकरणाचा योग्य पद्धतीने निपटारा केला जाईल.

5.5 आपल्या प्रकटीकरणची स्थिती जाणून घेण्याचा अधिकार व्हिसल ब्लोअरला असेल. याला कायदेशीर किंवा तत्सम कारणांचा अपवाद असेल.

**<u>संरक्षण</u>**

5.6 प्रामाणिक व्हिसल ब्लोअरला कोणत्याही प्रकारचा छळ, अनुचित वागणूक, त्रासापासून संरक्षण देण्यात येईल. परंतु विशिष्ट हेतूने प्रेरित आणि फुटकळ प्रकटीकरण दुर्लक्षित करण्यात येतील.

5.7 गुन्हेगारी किंवा अनुशासनात्मक कारवाईमध्ये जर व्हिसल ब्लोअरला साक्ष द्यावी लागली तर त्याला या प्रक्रियेची पूर्ण माहिती देण्याची व्यवस्था करण्यात येईल. यासंदर्भात व्हिसल ब्लोअरला प्रवास इत्यादी वर खर्च करावा लागल्यास योग्य पात्रतेनुसार त्याची भरपाई करण्यात येईल.

5.8 वरील परिच्छेद 5.7 चे उल्लंघन झाल्यास व्हिसल ब्लोअरला सक्षम प्राधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करता येईल. ज्यावर सक्षम प्राधिकारी तपास करून योग्य ती निवारक कारवाई करेल.

5.9 वरील तपासात मदत करणाऱ्या अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यालादेखील व्हिसल ब्लोअर प्रमाणेच संरक्षण देण्यात येईल.

**6. <u>पद्धती - आवश्यकता आणि संरक्षित प्रकटीकरणची हाताळणी</u>**

6.1 संरक्षित प्रगटीकरण किंवा तक्रारीसोबत व्हिसल ब्लोअर / तक्रारदाराचे नाव, व्यक्तिगत ओळख क्रमांक, स्थळ यासह माहिती सूचित करणारे पत्र जोडणे आवश्यक आहे. ते एका लिफाफ्यात घालून बंद / सीलबंद करून सक्षम प्राधिकारी यांना पाठवण्यात यावे. तसेच लिफाफ्यावर **संरक्षित प्रगटीकरण** असे नमूद करणे आवश्यक आहे. यावर या प्रकारे नमूद न केल्यास तसेच लिफाफा बंद / सीलबंद न केल्यास या पॉलिसी द्वारे व्हिसल ब्लोअरला संरक्षण देणे शक्य होणार नाही.

6.2 सक्षम प्राधिकारी आणि व्हिसल ब्लोअर यांच्यामध्ये स्वहित संघर्ष आहे असे व्हिसल ब्लोअरला आढळल्यास तो परिच्छेद 6.7 मध्ये निर्देशित केलेल्या पत्त्यावर लेखापरीक्षा समितीच्या अध्यक्षांना संरक्षित प्रकटीकरण पाठवू शकतो.

6.3 बेनामी किंवा निनावी संरक्षित प्रगटीकरण विचारात घेतले जाणार नाहीत.

6.4 संरक्षित प्रगटीकरण इंग्रजी, हिंदी किंवा स्थानिक भाषेत टंकलिखित किंवा स्वतःच्या हस्ताक्षरात लिखित स्वरुपात असावे. आणि अनुचित आचरण / विषय/ तक्रार स्पष्टपणे समजेल अशा पद्धतीने लिहिले जावे. ते तथ्याधारित असावेत आणि काल्पनिक नसावेत.

6.5 अनुचित आचरणचा तपास जो चौकशीचा विषय असेल किंवा Public Servant Enquiry Act 1850 किंवा Commission of Enquiry Act 1952 च्या अधीन आदेश असेल, तर ते या पॉलिसीच्या कक्षेत येणार नाही.

6.6 संरक्षित प्रगटीकरण पाठवण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता खालीलप्रमाणे :

*अध्यक्ष आणि प्रबंध संचालक*

*सक्षम प्राधिकारी*

*व्हिसल ब्लोर मेकॅनिझम*

*माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड*

*डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई 4000 010*

6.7 लेखापरीक्षा समिती अध्यक्ष यांना थेट संरक्षित प्रगटीकरण पाठवण्यासंबंधी त्यांचा पत्ता:

*अध्यक्ष, लेखापरीक्षा समिती*

*बायर कंपनी सचिव*

*माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड*

*डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई 400 010*

6.8 सक्षम प्राधिकारी संरक्षित प्रगटीकरणसह लिफाफा एका समर्पित गोपनीय अनुभाग समितीकडे पाठवेल. जी त्याची नोंद ठेवेल आणि त्याला समितीसमोर पेश करेल.

6.9 तपास समिती फुटकळ तक्रारीना चाळनी लवेल. तपासाकरता पुढे पाठवण्यायोग्य असलेले संरक्षित प्रगटीकरण गोपनीय अनुभागाद्वारे या करता नामनिर्देशित केलेल्या तपास अधिकाऱ्याकड़े पाठवण्यात येतील.

6.10 तपास समिती संरक्षित प्रकटीकरण मिळाल्यापासून शक्य तेवढ्या लवकर आणि 15 दिवसांच्या आत बैठक बोलावण्याचा प्रयत्न करेल.

## 7 <u>तपास आणि तपास अधिकारयाची भूमिका :</u>

**<u>तपास :</u>**

7.1 तपास समिति जर प्रारंभिक अवलोकनावर समाधानी असेल तर तपास प्रक्रिया तेव्हा सुरू केली जाईल की

क. कथित कृत्य हे अनुचित किंवा अनैतिक आचरण वा वर्तणूक आहे आणि

ख. आरोपच्या समर्थनार्थ दिलेली माहिती तपास करण्याकरता पुरेशी आहे. किंवा संबंधित विषयाचा तपास करणे आवश्यक आहे असे वाटल्याने त्यासोबत माहिती दिलेली नाही.

7.2 तपास समितीने घेतलेला तपास करण्याचा निर्णय हा दोषारोप समजला जाऊ नए तर सत्यशोधन प्रक्रियेचा भाग समजला जावा.

7.3 आरोपीची आणि व्हिसल ब्लोअरची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल.

7.4 औपचारिक तपास सुरू होताना आरोपीला / व्यक्तीना साधारणपणे आरोपांविषयी माहिती दिली जाईल आणि तपासणी दरम्यान त्यांचेकडील माहिती पुरावण्याची संधी दिली जाईल.

7.5 आरोपी तपासकामात तपासनीसाला अशा प्रकारे सहकार्य करण्यास बांधील असतील की त्यामुले लागू कायद्याअंतर्गत स्व दोषारोपण संरक्षणाशी कोणतीही तडजोड केली नाही.

7.6 तपासामध्ये कोणताही हस्तक्षेप न करण्याचे बंधन आरोपीवर राहील. पुरावा डाबून ठेवला जाणार, नष्ट केला जाणार नाही किंवा त्यासोबत छेडछाड केली जाणार नाही. तसेच साक्षीदारांवर प्रभाव टाकला जाणार नाही. वा त्याना घाबरवले वा धमकावले जाणार नाही.

7.7 आरोपीला तपास रिपोर्टमध्ये अन्तर्भूत महत्वपूर्ण निष्कर्षाला उत्तर देण्याची, जर त्याला प्रतिबंधित करण्याची कोणतीही ठोस कारणे नसतील तर, संधी देण्यात येईल. योग्य पुरावे असल्याखेरीज चुकीचे काम केल्याचा आरोप ठेवण्यायोग्य मानला जाणार नाही.

7.8 संरक्षित प्रकटीकरण मिळाल्यापासून 45 दिवसांच्या आत किंवा रेकॉर्ड करण्यायोग्य कारणांकरिता सक्षम प्राधिकारी परवानगी देईल अशा वाढवलेल्या कालावधीत तपासणी सामान्यपणे पूर्ण केली जाईल.

7.9 आरोपीला तपासकामाच्या निकालाची माहिती मिळवण्याच्या अधिकार आहे.

**तपासनीसाची भूमिका:**

7.10 तपासनीसला सत्य शोधनासाठी आणि विश्लेषणासाठी कार्यपद्धती अवलंबणे आवश्यक आहे. तपासनीस त्याच्या चौकशीच्या कार्यक्षेत्रात कार्य करताना सक्षम प्राधिकार्यकडून त्यांचे अधिकार प्राप्त करतील. तपासनीसने आपला अहवाल सक्षम प्राधिकर्यकड़े सादर करावा.

7.11 सर्व तपासनीस स्वतंत्र व निःपक्षपातीपणे त्यांची भूमिका पार पाडतील. प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता, संपूर्णता व व्यावसायिक मानकांचे पालन करून नैतिक आचरण राखण्यास तपासनीस बांधील असेल.

**8.कारवाई:**

8.1 सक्षम प्राधिकारी जर या मताचा असेल की तपास प्रक्रियेत अयोग्य आचरण केल्याचे दिसून आले आहे, जे ' माझगाव डॉक अधिकारी आचरण, अनुशासन आणि अपील नियम 1977 / स्थायी आदेश' अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे; तर तो संबंधित अधिकाऱ्यास लागू सेवा नियम / स्थायी आदेशांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देईल. तसेच हे प्रकरण योग्य कारवाईसाठी एमडीएलच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्याकडे निर्देशीत करेल.

8.2 संरक्षित प्रकटीकरणात नमूद केलेले अयोग्य आचरण सुधारण्यासाठी आणि / किंवा अशा अयोग्य कृती पुन्हा होऊ नयेत यासाठी सक्षम प्राधिकारी योग्य ती कारवाई करेल.

8.3 संरक्षित प्रकटीकरणावर पुढील कारवाईची आवश्यकता नाही असे जर तपासात स्पष्ट केले गेले असेल तर रिपोर्ट गोपनीय विभागात फाइल करण्यात येईल.

8.4 दुर्भावनायुक्त किंवा निराधार प्रकटीकरण आढ़लल्यास व्हिसल ब्लोअरविरूद्ध योग्य शिस्तभंगाची कारवाई सुरू केली जाईल.

**9. रिपोर्ट आणि पुनरावलोकन:**

सक्षम प्राधिकारी प्राप्त संरक्षित प्रकटीकरणासह केलेला तपास आणि केलेली कारवाई यांचा त्रैमासिक अहवाल लेखा परीक्षण समितीकडे पुनरावलोकनासाठी सादर करेल.

**10. अधिसूचनाः**

सर्व कार्यकारी संचालक / महाप्रबंधक / विभाग प्रमुख इत्यादींनी आपापल्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना या पॉलिसीची आणि तिच्यातील मुद्द्यांची माहिती द्यावी. ही व्हिसल ब्लोअर पॉलिसी कंपनीच्या सर्व नोटीस बोर्डावर ठळकपणे दिसेल अशी लावावी. आणि तिच्या प्रती सर्व नोंदणीकृत युनियन्सना पाठवण्यात याव्यात. ही पॉलिसी त्यातील सुधारणांसह एमडीएल इंट्रानेट पोर्टल आणि माझगाव डॉक ऑफिसर्स असोसिएशनला (एमडीओए) उपलब्ध करुन देण्यात तवी.

**11. वार्षिक पुष्टीकरणः**

सक्षम प्राधिकारी दरवर्षी याची पुष्टी करील की त्याने कोणत्याही कर्मचाऱ्यांचा लेखापरीक्षा समितीशी संपर्क नाकारलेला नाही. आणि व्हिसल ब्लोअरला कोणत्याही प्रतिकूल कारवाईपासून संरक्षण देण्यात आले आहे. हे प्रतिज्ञापत्र कंपनीच्या वार्षिक अहवालाशी संलग्न असलेल्या कॉर्पोरेट गव्हर्नन्स अहवालाचा भाग असेल.

**12. विवेचन:**

कोणत्याही कलमाचे / नियमाचे स्पष्टीकरण करण्यासाठी अ व्य सं हे सक्षम प्राधिकारी असतील, ज्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**13. दुरुस्ती:**

कोणत्याही वेळी कोणत्याही कलमात सुधारणा / बदल करण्याचा किंवा समाविष्ट करण्याचा / वगळण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे आणि अशा प्रकारच्या बदलांचा अहवाल लेखापरीक्षण समितीलाही देण्यात येईल.